# ख्रिश्चन धर्म व तत्वज्ञान

युवराज गुंडू सुरवसे
संशोधक विदयार्थी छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज.



**प्रस्तावना:**
जगाच्या निर्मितीचा विचार करता काही महत्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रीत करावे लागते. ते म्हणजे निसर्ग मानव आणि मानवाशी संबंधीत असणाऱ्या विविध संकल्पना अशा संकल्पनेमध्ये धर्म ही एक महत्वाचे संकल्पना मानली जाते जगात धर्माची निर्मिती कोणी केली याचे उत्तर कोणत्याही तत्ववेक्त्यास वा विचारवंताना देता येणार नाही. विश्वनिर्मिती बरोबर मानव निर्मिती झाली आणि मानवाच्या निर्मिती बरोबरच त्याचे दैनदिन वागणे, व्यवहार विचार पध्दती गरज आणी षड:रिपू यांच्यातून एक शिस्तबध्द अशी कल्पना बाहेर आली जिला धर्म असे संबोधले गेले. मानवाने कसे वागावे आणी दुसऱ्याशी त्याने कसा व्यवहार ठेवावा याचे जे अलिखित नियम तयार झाले. त्यातूनच धर्म व धर्मग्रंथांची निर्मिती झाली असावी. माणूस व स्वत:साठी कसे जगतो यापेक्षाही दुसऱ्यासाठी कसा वागतो यातूनच धार्मिक संकल्पना बाहेर पडणाऱ्या असाव्यात कारण सृष्टीच्या निर्मितीपासून आज पावेतो एक तत्व महत्वाचे ठरते आहे की मानावाची वैयक्तीक आयुष्यातील चूक किंवा वागणे हे त्याच्या स्वता:वर परिणाम करणारे असते परंतू याच मानवाची सार्वजनिक आयुष्यातील चूक व वागणे हे सभोवतालच्या समाजातील विघातक हल्ला करणारे असते म्हणूनच वैयक्तीक व सार्वजनिक क्षेत्राकरीता मानवाकरीता काही नियम, काही बंधने घालण्यात आली गरजेप्रमाणे आणी जगाची वाटचाल होत असताना त्यात बदलही झाले मात्र तत्व चिरस्यायी राहीले ते म्हणजे सत्य, सचोटी, प्रामाणिक, सहनशिलता आणि दुसऱ्यास त्रास न देण्याची प्रवृत्ती यातूनच विविध धर्म व धर्मग्रंथ निर्माण झाले. एक मात्र निश्चित की जगातील कोणत्याही धर्माचा केंद्रबिंदू हा मानव राहीला. अशा दृष्टीने धर्मनिर्मितीच्या प्रकीयेवर विचारमंथन केल्यानंतर ख्रिस्ती धर्माकडे आणी त्याच्या सर्वागीण स्वरुपाकडे जाता येते. कोणत्याही धर्म त्याचा धर्मग्रंथ व संस्थापक हा असहिष्ण नव्हता. सहिष्णतावर आणी परोपकारी वृत्ती ही प्रत्येक धर्माने अंगिकारली होती. सहिष्णूता या संकल्पेनेच्या अधिक जवळ जाणारे दोन धर्म म्हणजे एक हिंदू व दुसरा ख्रिस्चन धर्म होय. यापैकी हिंदू धर्म हा सर्वश्रेष्ठ ठरेल कारण या धर्माने कधीही धर्मप्रसाराचे वेड स्विकारले नव्हते. त्यामानाने यहुदी, मुस्लीम, ख्रिस्चन बौध्द, जैन या धर्माने वेळ प्रसंगी धर्मप्रसाराचे कार्य केलेले दिसते अपवाद फक्त हिंदूधर्म होय. मात्र ख्रिस्चन धर्माने धर्मप्रसार करताना कोणत्याही अतिरेकी भावना ठेवलेल्या नव्हत्या. कोणत्याही धर्माची निर्मिती प्रथम झाली हा वादातीत मुद्दा ठरतो. धर्मसंस्थापकांबाबतही हेच विधान योग्य ठरेल पण भारतीय धर्मग्रंथ गीता व त्यामधील तत्वांचा आधार घेतल्यास असेच दिसते की जेव्हा जेव्हा साधुसंतांचे रक्षण करण्याची वेळ आली दृष्ट कृत्याचा नाश करण्याची वेळ आली आणि, धर्म स्थापना करण्याची गरज निर्माण झाली तेव्हा तेव्हा परमेश्वराने जगात कुठेना कुठे मानवी रुपात अवतार घेतला.

> "परित्राणय साधुनाम विनाशायच दृष्टकृताम्
> धर्मसंस्थापनार्थायू संभवामी युगे युगे"

या गीतेतील वचनाप्रमाणे येशू ख्रिस्ताने पश्चिमेकडे जन्म घेतला आणि त्याचे चरित्र आणि त्याचे सामाजिक जीवन हयातून धर्मग्रंथ निर्माण झाला तो म्हणजे 'बायबल' होय. येशूचे जिवनच व बायबलची तत्वे याचा एकत्रित विचार म्हणजेच ख्रिश्चन धर्माचे स्वरुप होय. ते समजून घेण्यासाठी ख्रिश्चन धर्म व पश्चिम जगातील परिस्थितीचा आढावा घेणे गरजेचे आहे.

## १. ख्रिश्चन धर्माची पार्श्वभूमी.

येशू ख्रिस्तांची जन्मभूमी सुमारे ४५०० वर्षे परमेश्वराने म्हणजेच पित्याने अर्थात आकाशबापाने या जगाची निर्मिती केली. पृथ्वीला आकार नव्हता सर्वत्र अंधकार होता तेव्हा आकाशातील बापाने येशू ख्रिस्तास या पृथ्वीवर पाठविले. ख्रिस्तच्या नावानेच प्रचलीत झालेल्या संप्रदायास ख्रिस्ती धर्म असे म्हटले जाते. ख्रिस्ती धर्म हा शास्त्रावर किंवा सिध्दांतावर किंवा कोणत्याही सुत्रावर आधारला नाही. येशूबद्दल असणारी अपार श्रध्दा हाच या धर्माचा आधार आहे. जगाच्या अंतापर्यंत येशू जिवंत रहाणार आहे असा या धर्मीयांचा विश्वास आहे. 'ख्रिस्त' हा शब्द ग्रीक भाषेतील आहे. ख्रिस्तोस या शब्दातून तो निर्माण झालेला आहे. ग्रीक भाषेतील ख्रिस्तोस या शब्दाचा अर्थ अभिषक्त असा होतो. मग

येशूला मसीहा का म्हटले जाते याचे उत्तर म्हणजे हिब्रू भाषेत अभिषिक्त शब्दाला मसिहा असे म्हटले जाते. म्हणजेच ख्रिस्तोस व मसिहा या मधून ख्रिस्त हा शब्द पुढे आलेला आहे. येशू आकाशातून जमिनीवर येताना स्वर्गातील पवित्र आत्म्यांनी अभिषेक केलेला होता असे ख्रिश्चन लोक मानतात. कारण येशू नेहमी असे म्हणत असे की मी ईश्वराचा दूत आहे आणि मानव जातीच्या कल्याणासाठी व पतितांच्या उध्दारासाठी मी पृथ्वीवर पाठविला गेलो आहे म्हणून येशू सर्वांग आहे. त्याच्याकडे कोणताही भेदभाव नाही जो तो मानव स्वत:ची पापे कबूल करतो व पश्चाताप व्यक्त करतो त्या सर्वांचे कल्याण येशू करतो असे या धर्माचे अनुयायी मानतात ईश्वर एक आहे तरीही त्याची तीन रुपे आहेत आकाशातील पिता, त्याचा पुत्र येशू आणि पवित्र आत्मा अशी ती तीन रुपे आहेत या तिघांमधून ईश्वर  निर्माण होतो. असा ख्रिश्चन धर्माच्या सिध्दांत आहे यालाच त्रिक सिध्दांत म्हणतात.

जसे समुद्र ढग व पाऊस ही एकाच पाण्याची भिन्न रुपे असतात तसेच पिता पुत्र व व आत्मतत्व ही ईश्वराचे भिन्न रुपे असतात ईश्वर सनातन, स्वयंभू अनादी अनंत आहे त्याने जग व मानव निर्माण केला पापांचा नाश अन्यायाचा द्वेष तो करतो पापी मानसांस शिक्षाही करतो मानसाने कितीही पाप केले असले परंतू त्याने पश्चातापाने परमेश्वरापुढे क्षमा मागितली तर ईश्वर त्याला क्षमा करतो असे ख्रिश्चन धर्माचे महत्वाचे तत्व आहे.

## २) ख्रिश्चन धर्मग्रंथ बायबलः

हिंदूचा धर्मग्रंथ म्हणून भगवत 'गीतेस' मान मिळतो. मुस्लीमांचा 'कुराण-ए-शरिफ' हा धर्म ग्रंथ आहे. ग्रीकांचा 'झेंदअवेस्ता' धर्मग्रंथ आहे. तर ख्रिश्चनांचा बायबल हा धर्मग्रंथ आहे. बायबल म्हणजे येशू ख्रिस्त व त्याचे जिवन चरित्र तसेच ख्रिश्चन धर्माची ओळख असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. येशू ख्रिस्ताचा जन्म बैथलैम या शहरात इ.स. चार मध्ये झाला. त्यानंतर खुप खडतर असे आयुष्य त्याच्या वाटयास आले आणि अगदी तरुणपणी त्याला सुळवर चढविले गेले. या सर्व घटना पाहता इ.स.ची सुरवात होय. त्यावेळी बायबलची निर्मिती ही देखील इ.स.च्या अगदी सुरवातीला म्हणजे पहिल्या दुसऱ्या शतकातच झालेली होती. बायबलाच पवित्र शास्त्रही म्हटले जाते. येशूच्या मृत्युनंतर साधारणपणे १०० वर्षांनी हा ग्रंथ रचला गेला. मुळ बायबल हे ग्रीक भाषेतील आहे. दोन भागांमध्ये असलेला हा धर्मगंथ नंतर वेगवेगळया भाषांमध्ये लिहला गेला दोन भाग म्हणजे जुना करार व नवा करार होय. यहुदी लोकांच्या धर्मग्रंथ हा जुना करार म्हणून ओळखला जातो आणि नवा करार म्हणजे येशूचे चरित्र व कार्य समजले जाते. नव्या करारात म्हणजेच बायबल मध्ये एकुण चार पुस्तके लिहली गेली. या सर्व ग्रंथामध्ये येशूचे चरित्र त्याची वचने असुन या संदर्भामध्ये येशच्या शित्यांनी लिहलेली पत्रेही आहेत. बायबलचा मुळ गाभा हा मानवी समाजाचे कल्याण परोपकार गोर-गरिबांचा कैवार आणि पापी लोकांना शरणगती व पश्चातापातून सांगितलेला तारणाचा मार्ग हा होय. येशू ख्रिस्त व त्याच्या चरित्राबद्दल अनेक ग्रंथामधून माहिती मिळते येशू हा चमत्कारिक पुरुष नव्हता तर तो खऱ्या अर्थाने ईश्वराचा प्रेषित होता. परंतु हे येशूच्या अवती-भोवती असणाऱ्या समाजाला व राज्यकर्त्यांना समजत नव्हते येशू हा जसजसा लोकपप्रिय होवू लागला तसतसे त्याचे शत्रु वाढु लागले. विशेषतः ज्यु लोक त्याच्या विरोधात होते. येशू जन्मला ते गाव म्हणजे बेथलॅम शहर हे हेरोद राजाच्या अमला खाली होते. त्याच्या ही कानावर येशूच्या चमत्काराबद्दल व लोकप्रियतेबद्दल गोष्टी गेल्या आम जनतेस येशूने राजकीय नेतृत्व करावे असे वाटू लागले. इस्त्रायलवर ज्या वेळी-रोमन साम्राज्याचा अंकुश होता येशूने राजकीय नेतृत्व करावे आणि रोमन साम्राज्याचा पराभव करावा असे जनता म्हणू लागली. प्रचंड वाढत्या लोकप्रियतेमुळे अखेर त्यास मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली व ती अतिशय कठोरपणे अमलातही आणण्यात आली. या सर्व घटनासह बायबलचा नवा करार रचला गेला आहे. अशारितीने बायबल म्हणजे येशू व येशू म्हणजे बायबल असे समीकरण झालेले दिसते. हा धर्मग्रंथ ख्रिश्चन  धर्मायांना अत्यंत पवित्र आहे.  पण परंपरेने चालत आलेल्या कल्पना, रुढी, परंपरा अंधश्रध्दा अवैज्ञानिकदृष्टी जातीयता लिंगभेद उच्चनिच भेदभाव इ. महाराक्षस समाजात हैदोस घालीत असे. धर्मप्रमुख व राजप्रमुख अनियंत्रितपणे वागत होते. सर्व सामान्यांचा कैवारीच नव्हता म्हणून नेहमी परमेश्वराच्या कृपेची म्हणजेच अवतारी पुरुषांची वाट पाहिली जायची अशा भयाण परिस्थितीत इ.स. च्या पहिल्याच शतकात जर एखाद्या जनतेचा कैवारी जन्मास आला असेल व त्याने आपले संपूर्ण आयुष्य सामान्यासाठी वाहिले असेल तर त्याला ईश्वर किंवा ईश्वरपुत्र असे जनतेकडून मानले जाते.  यामध्ये काहीच गैरनाही अशा प्रकियेतून जन्मास आलेला येशू हा ख्रिश्चन धर्म संस्थापक ठरतो त्याने ज्या प्रतिकूल परिस्थितीत कार्य केले होते. त्याचा ठसा समाजावर उमटणे आणी युरोपात आणी अशियात येशूला परमेश्वर मानणे यामध्ये काहीच वावगे नाही.

## ३) 'बाप्तीस्मा':-

जगामध्ये हिंन्दू धर्म सोडल्यास बाकीच्या सर्व धर्मानी धर्मप्रसाचे कार्य केले होते व करित आहे खिश्चन धर्मियांनी सुध्दा धर्म प्रसाराचे कार्य जगभर केलेले दिसते. मात्र त्यांच्या मध्ये कोठेही जुलूम जबरदस्ती व अतिरेकीपणा नव्हता. ख्रिश्चन धर्माचा स्विकार करणे म्हणजे बाप्तीस्मा घेणे होय. ख्रिश्चनांचा जगात प्रवेश करण्यासाठी हा पहिला धार्मिक विधी केला जातो बाप्तीस्मा घेणे म्हणजे नविन जन्माचा स्विकार करणे होय. हा विधी तेव्हाच होतो जेव्हा बाप्तीस्मा घेणाऱ्याचे अतःकरण पालटलेले असते. पाप नष्ट झालेले असते व त्याच्यामध्ये पवित्र आत्मा ख्रिस्ताशी एक रुप होणे होय.

प्रथम दिक्षा घेण्यास स्नान आवश्यक असे. पण पुढे पाण्याचे दुर्भिक्ष येवू लागले. त्यामुळे मस्तकावर पाणी शिंपडणे किंवा मस्तकाला बोटाने पाणी लावणे ही रित आली पाणी शिंपडल्यानंतर ख्रिश्चन धर्माचा पुरोहिताने मस्तकावर हात ठेवला की बाप्तीस्मा देण्याची क्रिया पूर्ण

होते. बाप्तीस्मा देणे म्हणजे ख्रिश्चन धर्म स्विकारणे होय. या संकल्पनेस ख्रिश्चन धर्मात महत्वाचे स्थान मिळते. ख्रिश्चन धर्मामध्ये बाप्तीस्मा हया संकल्पने बरोबरच प्रभू भोजन ही संकल्पनाही महत्वाची मानली जाते. येशूला जेव्हा cross वर चढविले होते. त्यापूर्वी त्याने स्वतः व काही शिष्यासह एकत्र  भोजन केले होते. हीच घटना पुढे ख्रिश्चन धर्माचा धार्मिक विधी म्हणून महत्वाचे ठरले. येशूचे शब्द उच्चारणे व परमेश्वरास भाकरी व द्रासरस अर्पण करणे व नंतर तो प्रसाद स्वतः खाणे असा हा विधि असतो. हे दोन पदार्थ म्हणजे ख्रिस्ताचे अस्तित्व असणारे पदार्थ आहेत असे कॅथॉलीक पर्याय मानतात. या पदार्थांच्या रुपाने ख्रिस्ताची प्राप्ती होते असे लूथर पर्याय मानतात. येशू व त्याचे आत्मबलीदान याचे स्मरण म्हणून प्रभू भोजन या धर्मामध्ये महत्वाचे मानले जाते. आजही खिश्चन धर्मिय एकत्र येऊन सहभोजन करतात, ते यासाठीच येशूशी जवळीक साधण्याचा माध्यम म्हणून प्रभू भोजनाकडे पाहीले जाते. थोडयाफार फरकाने इतर ही धर्मामध्ये अशा संकल्पना व प्रक्रिया असतात उदा. हिन्दू धर्मात देवाचा प्रसाद, भंडारा, समाराधना  या संकल्पना आहेत. मुस्लीम धर्मात त्यांच्या सणांना एका भोजन दालचाखाना हया कल्पना आहेत. यावरुनही सर्व धर्मातील तत्वे एकच असतात हे पुन्हा एकदा पटते.

### ४) ख्रिश्चन धर्माचे तत्वज्ञानः-

धर्म म्हटला की त्याचे तत्वज्ञान व धर्मग्रंथ महत्वाचा ठरतो.  प्रत्येक धर्माचे धर्मग्रंथ वेगवेगळे असले तरी ही तत्वज्ञान मात्र एकच असते ते म्हणजे सर्वधर्म, समभाव, परोपकार, क्षमाशीलता इ. फक्त ही तत्वे मांडताना ती वेगवेगळया भाषेत मांडली गेली एवढेच ख्रिश्चन धर्म हा ही जगातील एक महत्वाचा धर्म मानला जातो. येशू ख्रिस्त व त्याचे जिवन चरित्र हा ख्रिश्चन लोकांचा वंदनीय व आदणीय असा मुद्दा आहे. या धर्माचा केंद्रबिंदू येशू आहे. त्याला जीझस असेही म्हटले जाते. ख्रिश्चन धर्माचे तत्वज्ञान म्हणजे येशूचे विचार होय. म्हणूनच या धर्माचा अभ्यास करत असताना येशूचेच जिवन चरित्र अभ्यासावे लागते. येशूचे चरित्र त्याची विचार सरणी आणि त्याने केलेली कामे याचे सार म्हणजे ख्रिश्चन धर्म होय. धार्मिक पुस्तके आणि त्या पुस्तकांमधील संकल्पना समजाऊन घेणे हे खिश्चन धर्मीयांना फार आवडत असे या दृष्टीकोनातून काही इंग्रजी संदर्भग्रंथामध्ये उल्लेख मिळतो तो असा. वरील संदर्भ ग्रंथामध्ये येशू ख्रिस्ताचे जिवन चरित्र अभ्यासलेले आहे. याच ग्रंथात ख्रिश्चनांच्या प्रार्थना स्थळांचा उल्लेख टेम्पल म्हणजे मंदिर असा केलेला आहे. ज्याप्रमाणे हिंदू धर्मातील मंदिर असतात त्याप्रमाणेच ख्रिश्चन धर्मियांची चर्चेस आणी मुस्लीमाची मशिदी असतात. यावरुन ही सर्व धर्म व त्यांची तत्वे यामध्ये साम्य असते हे पटते. ख्रिश्चन धर्माचे तत्वज्ञान पाप मुक्ती पश्चाताप पुनर्जन्म, भक्तीभावना, उपासना, पुजा या सर्व संकल्पना भोवती विणले गेले आहे. मनुष्य  मुलतः पापी नसतो. पण ईश्वराची आज्ञा मोडल्याने तो पापी होतो अशा पापी माणसास मुक्ती देवून मोक्षाला पाठविण्याचे काम येशू करतो. पश्चाताप या शब्दास या धर्मास महत्व आहे. पापाबद्दल दुःख करणे व ते ईश्वराजवळ कबूल करणे म्हणजे पश्चाताप होय. पश्चातापामुळे स्वर्गप्राप्ती होते. जन्मामुळे कोणीही ख्रिश्चन बनत नाही तर पश्चातापने व अंतकरणाने येशूचा स्विकार केल्यास तो ख्रिस्ती बनतो. परमेश्वराची म्हणजेच येशूची अनन्य भक्ती करणे. हे ही या धर्माचे तत्व आहे. प्रत्येकाने आपल्या शत्रुवरही प्रेम करावे. म्हणूनच येशूला जेव्हा सुळावर चढविले तेव्हा त्याने त्या लोकांना क्षमा करण्याची प्रार्थना केली होती भिक्षू वृत्ती म्हणजे संसाराचा त्याग करुन शुध्द आचरणाने एखाद्या मठात राहणे होय. या तत्वामुळे ४ थ्या शतकाअखेरीस युरोपात मठसंस्थेचा विकास झाला आणि भिक्षू व भिक्षूर्णीना आदराचे स्थान मिळाले. उपासना म्हणजे परमेश्वराची प्रार्थना होय. प्रार्थना म्हणजे देवाशी संभाषण होय. अस ख्रिश्चन लोक मानतात. ज्याला क्षमा हवी आहे, जो देवाला भितो, तो देवाची आज्ञा पाळतो व येशूवर विश्वास ठेवतो. त्याचीच प्रार्थना परमेश्वर ऐकतो. प्रार्थना वैयक्तीक व सामुदायिकरित्या केली जाते समाजाच्या हितासाठी सामुदायिक प्रार्थना महत्वाची असल्यामुळे येशूने सामुदायिक प्रार्थनेवर भर दिला होता. प्रार्थनेसाठी काळवेळेची बंधंने नसावेत पुजा हेही एक तत्व धर्मात असते. ख्रिस्ती धर्मातील पुजा म्हणजे काय? ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. त्याची पुजा म्हणजे संपूर्ण मानव जातीवर प्रेम करणे ही होय. अशा पुजेला कोणतेही विधी नसतात म्हणूनच ख्रिश्चन धर्मात प्रार्थना ही महत्वाची ठरते. येशूने मुर्ती पुजेला विरोध केलेला होता त्यांचा ही मुर्तीपुजेला विरोध होता मग येशूचे व ख्रिश्चन धर्माचे प्रतिक असणारा Cross हा काय आहे. तर ख्रिस्ती धर्माचे एक पवित्र चिन्ह म्हणून क्रॉसकडे पाहिले जाते. आत्मा व मोक्ष याचेही ते प्रतिक आहे असे ख्रिस्ती लोक मानतात अशारितीने ख्रिश्चन धर्माचे हे तत्वज्ञान येशूच्या चरित्रातून आणि बायबल मधून समजते.

### सारांशः

ख्रिश्चन धर्माने धर्मप्रसार करताना कोणताही अतिरेकी मार्ग स्विकारलेला दिसत नाही. तसेच ख्रिश्चन धर्माचे कार्य मानव जातीच्या कल्याणासाठी व पतितांच्या उद्धारासाठी दिसून येते. सर्व धर्मियांच्या प्रमुख ग्रंथात असलेल्या तत्वांचा समावेश बायबलमध्येही असून त्यातूनच प्रेम,परोपकार, भूतदया,शरणागती, पश्चाताप हि तत्वे दिसून येतात व कालानुरूप समाजास उपयोगी ठरणारी आहेत.

### संदर्भः


१. भारतीय संस्कृती कोष
२. भारतीय शब्दकोष
३. दि हिस्ट्री ऑफ चर्च
४. मसिहा, अशोक प्रभाकर आंग्रे
५. नवा करार (मराठी आवृती) - १९९८
६. स्मृतीसंहिता - सोलापूर ख्रिश्चन चर्च शतकोत्तर सुवर्णमहोत्सव - २०१४,